


सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - १५ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ गुरुवार दि. ३० जानेवारी २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६


## काँग्रेसची लांगूलचालनाची परंपरा उद्धव ठाकरेंनी अंगिकारली वक्फ विधेयकावरुन मुख्यमंत्री फडणवीसांचे टीकास्त्र

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०नवी दिल्ली**

वक्फ (दुरुस्ती) विधेयकाचा विचार करणाऱ्या संसदेच्या संयुक्त समितीने अहवालाचा मसुदा आणि सुधारित विधेयक बहुमताने स्वीकारले आहे. खासदारांना असहमती नोंदवण्यासाठी बुधवार पर्यंतची मुदत देण्यात आली होती. इंडिया आघाडीचा भाग असलेल्या उद्धव ठाकरेंच्या शिवसेना पक्षानेही या विधेयकावर आपली असहमती दर्शवली. यावरुन आता भाजपने उद्धव ठाकरे यांना लक्ष्य केलं आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही उद्धव ठाकरेंच्या सेनेची लांगूलचालनाची भूमिका मतांच्या लाचारीसाठी असल्याचे म्हटलं आहे.

वक्फ दुरुस्ती विधेयकाचा आढावा घेणाऱ्या संयुक्त संसदीय समितीने बुधवारी या मसुद्याला मंजुरी दिली. जेपीसीच्या या निर्णयावर विरोधकांकडून प्रचंड नाराजी व्यक्त करण्यात आली. त्यात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या नावाचाही समावेश होता. ठाकरे यांनीही जेपीसीच्या निर्णयाबाबत असहमत व्यक्त करत निषेध व्यक्त केला. ठाकरे गटाच्या खासदारांनी वक्फ बोर्डाच्या विधेयकाच्या विरोधात भाष्य केलं. यावरुनच आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उद्धव ठाकरेंवर निशाणा साधला. ते दिल्लीत बोलत होते.




मला असं वाटतं की उद्धव ठाकरे यांच्या सेनेने सातत्याने लांगूलचालनाची भूमिका घेतलेली आहे. केवळ एका समाजाच्या पाठीशी उभं राहायचं ही काँग्रेसची लांगूलचालनाची परंपरा होती. ती अल्पसंख्याक लांगूलचालनाची परंपरा उद्धव ठाकरेंच्या सेनेने अंगीकारली हे पाहून मला अतिशय दुःख झालेलं आहे. कारण वक्फ बोर्डाचे बिल हे कुठल्याही समाजाच्या विरोधात नाही. मुस्लिम समाजाच्या तर विरोधात बिलकुल नाही. या ठिकाणी वक्फच्या माध्यमातून जो गैरकारभार आणि गैरव्यवहार चाललेला आहे तो संपला पाहिजे म्हणून हे विधेयक आणलेलं आहे. अशावेळी फक्त मतांच्या लाचारी करता याचा विरोध ते करत असतील तर मला वाटतं की महाराष्ट्रातील जनता हे पाहते आहे. कशाप्रकारे ते लांगूलचालन करत आहे हे सगळ्यांच्या लक्षात आलंय, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

## बैठकीत गरमागरमी! 'लई मागचे बोलू नका अजितदादांनी धस यांना सुनावले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०बीड**

उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्याकडे बीड जिल्ह्याचे पालकमंत्रिपद गेल्यानं पहिल्याच होणाऱ्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीकडे सगळ्यांचे लक्ष लागले होते. या बैठकीत झालेल्या जोरदार वादावाद झाल्याचं समोर येत आहे. भल्याभल्यांना आपल्या शाब्दिक हल्ल्यांनी शांत बसायला लावणाऱ्या भाजपचे आमदार सुरेश धस यांना अजितदादांनी चांगलं झापलं आहे.

जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून २०२१ ते २०२२ या काळात कुठलेही विकासकामे न करतात ७३ कोटी रूपये लाटल्याचा मुद्दा सुरेश धस यांनी बैठकीत मांडला. यावेळी, 'तुम्ही लई मागचे बोलू नका, तुम्हाला जे म्हणायचे आहे, त्याची लेखी तक्रार करा,' असं सांगत अजितदादांनी सुरेश धस यांना सुनावत त्यांना फार वाव दिला नाही. बैठकीत प्रसारमाध्यमांना प्रवेश नव्हता. मात्र, बैठकीत अजितदादांनी सुरेश धस यांना सुनावल्याची चर्चा अधिकारी आणि लोकप्रतिनिधींमध्ये रंगली होती.



बैठकीत अजितदादा पवार म्हणाले, अधिकाऱ्यांनी कुणाच्याही दबावात काम करण्याची गरज नाही. पोलिसांच्या कामातही राजकीय हस्तक्षेप होणार नाही. बीड जिल्ह्यातील कामे दर्जेदार झाली पाहिजेत. तुम्हाला कोणतीही अडचण आली, तर तुम्ही थेट माझ्या कार्यालयाशी संपर्क करा.असे हि दादा म्हणाले.

## माझा मराठीचा बाणा मी बोथट करत नाही; भाजपा नेत्यांच्या भेटीवरही राज ठाकरेंचा खुलासा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३०मुंबई**

माझ्यासोबत राहणार असाल तर ठाम राहा. आपल्याला जे महाराष्ट्रात मराठी माणसं आणि हिंदुसाठी करायचे ते करणारच आहे. तुमचा राजकीय अभ्यास दांडगा असला पाहिजे. तुम्ही समोरच्याला पुरून उरलं पाहिजे असं सांगत राज ठाकरेंनीभाजपा नेत्यांच्या गाठीभेटीवरून होणाऱ्या चर्चेवर भाष्य केले.

वरळीतील राज्यस्तरीय पदाधिकारी मेळाव्यात राज ठाकरेंनी सांगितले की, मला भाजपचे लोक भेटायला येतात, मी त्यांना काय नाही म्हणू ? तुमच्या घरी चहा प्यायला येतो असं कोणी म्हणलं तर तुम्ही नाही म्हणाल का? बरं माझ्याकडे चहा प्यायला कोणीही आले तरी मी तुम्हाला कधी विकलं नाही, मी पुन्हा सांगतो कोणीही भेटून गेलं तरी तुमच्यावरचं प्रेम आणि पक्षाची भूमिका याच्याशी कधीही प्रतारणा करणार नाही असं राज ठाकरेंनी स्पष्ट केले.



तसेच १९६६ साली शिवसेनेचा जन्म झाला, शिवसेनेने प्रजा समाजवादी पक्ष ते मुस्लिम लीग सोबत युती केली, पुढे काँग्रेससोबत पण युती केली होती. थोडक्यात त्या त्या वेळेला गरज बघून युती केली. सगळ्यांनी भूमिका बदलल्या, वाट्टेल त्या युत्या केल्या..त्या चालतात..पण त्यांनी केलं की प्रेम आम्ही केला की बलात्कार..हा कुठला न्याय? भाजपाने महाराष्ट्रात ज्यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप केले त्या सगळ्यांना पुढे पक्षात घेतलं आणि त्यांना मंत्री केलं. नारायण राणे, गणेश नाईक, विजयसिंह मोहिते पाटील, हर्षवर्धन पाटील, अशोक चव्हाण आज ज्यांच्यावर आरोप केले ते मंत्रिमंडळात आहेत. मी जे बोललो, ते कधी मागे घेतले नाही. जे बोललो होतो त्याला आधार होते. जे चांगले कराल त्याला चांगले बोलतो, वाईट कराल त्यावर बोललो. फडणवीसांनी, किरीट सोमय्यांनी किती लोकांवर आरोप केले, ते सगळे भाजपमध्ये आले, लोक हल्ली देव पाण्यात घालून बसतात की किरीट सोमय्यांनी किंवा फडणवीसांनी आरोप केले की पक्षात घेतात, पुढे मंत्री करतात. एवढा चिखल झालाय पण त्यांना कुणी पत्रकार विचारणार नाही असं सांगत भूमिका बदलतो या आरोपांवर राज ठाकरेंनी भाष्य केले.

**पक्ष संघटनेत आणणार आचारसंहिता**

दरम्यान, येत्या काळात पक्षात खालपासून वरपर्यंत आचारसंहिता आणणार आहे. पुढील १५ दिवसांत प्रत्येकाला जबाबदारी आणि आचारसंहिता आखून देईन. मी अनेक पराभव पाहिलेत. पराभवाने खचलो नाही आणि विजयाने हुरळून गेलो नाही. खचलेल्यांचं नेतृत्व मला करायचं नाहीये. माझ्यासोबत राहायचं असेल तर ठाम राहा. या राज्यातील मराठी माणसासाठी, हिंदूसाठी जे करायचं आहे ते मी करणार, ते आपलं स्वप्न आहे. वेळ लागेल पण करणार हे नक्की असं सांगत राज यांनी पक्ष संघटनेत बदलाचे संकेत दिले आहेत.

## शाळकरी मुलांना अंडी आणि फळे देण्यासाठी सरकारकडे पैसे नाहीत का?, काँग्रेसचा सवाल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३० मुंबई**

भाजपा युती सरकारने आता शाळकरी मुलांच्या आहारावरच गदा आणली आहे. मध्यान्न भोजन योजनेतून शाळकरी मुलांना आहारातून प्रोटीन मिळावे यासाठी अंडी व फळे दिली जात होती. परंतु भाजपा युती सरकारने आता अंडी व फळांना निधी देण्यास नकार देत शाळा व्यवस्थापनांनी स्वतः खाजगी देणगीदारांकडून पैसे उपलब्ध करावेत असा जीआर काढला आहे. सरकारचा हा निर्णय सरकारी



शाळांमध्ये जाणाऱ्या सर्वसामान्य गरिब घरातील मुलांवर अन्याय करणारा आहे. हा निर्णय रद्द करून निधी पूर्वीप्रमाणेच द्यावा, अन्यथा रस्त्यावर उतरून सरकारला जाब विचारू, असा इशारा काँग्रेसचे मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे यांनी दिला आहे.

यासंदर्भात प्रतिक्रिया देताना अतुल लोंढे म्हणाले की, भारतीय जनता पक्ष युतीचे सरकार अजब गजब निर्णय घेणारे सरकार आहे. शालेय मुलांच्या मध्यान्न भोजन योजनेतील अंडी, दूध व फळांसाठी सरकारक़डे पैसे नसतील तर सरकारची आर्थिक परिस्थिती रसातळाला गेली आहे किंवा सर्वसामान्य गरीब घरांतील मुलांना पौष्टीक आहार मिळू नये असा त्याचा अर्थ आहे. गरिबांना महिन्याला ५ किलो मोफत धान्य व १५०० रुपये दिले म्हणजे हा घटक गप्प बसेल व सरकारला प्रश्न विचारणार नाही यासाठी हे षडयंत्र असावे. परंतु सरकारच्या या निर्णयाला काँग्रेस पक्षाचा विरोध आहे. शाळेतील विद्यार्थ्यांना आठवड्यातून एकदा एक अंडे दिले जाते, त्यासाठी किती निधी लागणार आहे? तेवढेही पैसे सरकार नाहीत असे नाही. स्वतःची जाहिरातबाजी करण्यासाठी सरकार कोट्यवधी रुपयांची उधळपट्टी करते पण गरिबांना काही द्यायचे असेल तर निधी नसतो कसा? असा सवाल अतुल लोंढे यांनी विचारला आहे.

## 'ऑपरेशन द्रोणागिरी' पथदर्शी प्रकल्पासाठी महाराष्ट्रातून एकमेव वाशीम जिल्ह्याची निवड

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३० अकोला**

देशातील सहा विशेष जिल्ह्यांमध्ये वाशीमची निवड 'ऑपरेशन द्रोणागिरी' या महत्त्वाकांक्षी उपक्रमासाठी करण्यात आली आहे. 'ऑपरेशन द्रोणागिरी' प्रगत तंत्रज्ञानाच्या मदतीने जिल्ह्याला एक नवी ओळख निर्माण करून देणारा उपक्रम ठरणार आहे. कृषी क्षेत्रात 'जिओस्पेशियल' तंत्रज्ञानाचा उपयोगाचा प्रयोग वाशीम जिल्ह्यात केला जाईल. महाराष्ट्रातील एकमेव जिल्हा म्हणून वाशीमची निवड झाली.



विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागाने डिसेंबर २०२२ मध्ये सुरू केलेल्या राष्ट्रीय जिओस्पेशियल धोरणांतर्गत भारताला 'जिओस्पेशियल' तंत्रज्ञानात प्रगत होण्याचे उद्दिष्ट ठेवले. या उपक्रमाद्वारे नावीन्यपूर्ण तंत्रज्ञानाचा वापर करून शेतकरी, युवक आणि महिलांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवणे हा मुख्य हेतू आहे. जून २०२५ पर्यंत देशातील पाच राज्यांतील सहा जिल्ह्यांमध्ये राबवण्यात येणार आहे. या जिल्ह्यांमध्ये महाराष्ट्रातील वाशीम, उत्तर प्रदेशातील वाराणसी, हरियाणातील सोनीपत आणि गुरुग्राम, आसाममधील कामरूप आणि आंध्र प्रदेशातील विजयनगर यांचा समावेश आहे. प्रत्येक जिल्ह्याला विशिष्ट क्षेत्रांशी संबंधित आव्हानांसाठी पथदर्शी प्रकल्प म्हणून निवडण्यात आले. वाशीम जिल्ह्यात कृषी क्षेत्रात 'जिओस्पेशियल' तंत्रज्ञानाचा उपयोग केला जाणार आहे.जिल्ह्यातील समस्य व प्रश्नांवर ड्रोनद्वारे अचूक माहिती गोळा करून उपाययोजना करण्यात येईल. शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाची ओळख करून देत, त्यांच्या उत्पन्नात वाढ करण्यासाठी आणि पर्यावरणपूरक पद्धतींचा अवलंब करण्यासाठी हा प्रकल्प महत्त्वाचा ठरणार आहे.

'ऑपरेशन द्रोणागिरी'मुळे शेतकऱ्यांच्या समस्या सोडवण्यासाठी तांत्रिक आणि वैज्ञानिक दृष्टिकोन वापरला जाईल. ड्रोनच्या माध्यमातून अचूक फवारणी, पिकांचे आरोग्य निरीक्षण, आणि कीड व रोग व्यवस्थापन करणे अधिक सुलभ होईल. याशिवाय, स्थानिक युवक आणि महिलांना 'जिओस्पेशियल' तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण मिळाल्यामुळे रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होतील. जिल्ह्याच्या प्रगतीसाठी हा उपक्रम एक 'गेम-चेंजर' ठरेल, याचा आम्हाला विश्वास आहे.

**– बुवनेश्वरी एस, जिल्हाधिकारी, वाशीम.**

## सर्व ग्रहांच्या दर्शनाचा 'चंद्र असेल साक्षीला', अवकाश प्रेमींसाठी पर्वणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अकोला**

एकाचवेळी सर्व ग्रह सूर्याच्या एका बाजूला आल्याने सर्व अवकाश प्रेमींच्या उत्साहात भर घालण्यासाठी येत्या १ फेब्रुवारीपासून चंद्र देखील साक्षीला राहणार आहे. सर्व ग्रहांचा परिचय करण्यात त्याची मदत होईल, अशी माहिती ज्येष्ठ खगोल अभ्यासक प्रभाकर दोड यांनी दिली.

रात्री प्रमाणेच दिवसा सुद्धा आकाशात ग्रहतारे असतात. मात्र, प्रखर सूर्य प्रकाशात ते दिसत नाहीत. याला अपवाद शुक्र ग्रह आहे. सर्वात तेजस्वी शुक्र सध्या पृथ्वीच्या जवळ आणि सूर्यापासून दूर असल्याने तसेच चंद्र युतीमुळे या एकमेव ग्रहाचे दिवसा दर्शन शक्य होते. यासाठी दूपारी सावलीतून दक्षिण आकाशात वरच्या भागात आधी चंद्र व नंतर शूक्र दर्शन शक्य असेल. पृथ्वीचा उपग्रह चंद्र आयनिकवृत्त मार्गावरुन अर्थात राशी चक्रातून रोज १२ अंश अंतर सरकताना रोज नक्षत्र बदलतांना दिसतो, असे प्रभाकर दोड यांनी सांगितले.



१ फेब्रुवारीला चंद्र पश्चिम आकाशात वलयांकित शनी ग्रहाच्या जवळ तर २ फेब्रुवारीला रविवारी सर्वात तेजस्वी शुक्र ग्रहाजवळ आणि ३ रोजी रेवती नक्षत्रात, ४ ला मेष राशीत अश्विनी जवळ असेल. ५ फेब्रुवारी रोजी चंद्र भरणी नक्षत्रात नेपच्यून ग्रहाजवळ तर ६ ला कृत्तिका नक्षत्र गुच्छाजवळ पाहता येईल. ७ फेब्रुवारी रोजी चंद्र त्याच्या आवडत्या रोहिणी नक्षत्रात, गुरु ग्रहाजवळ उत्तररात्रीपर्यंत बघता येईल. ८ ला चंद्र सर्व परिचित मृग नक्षत्रात पूर्वेस तर ९ ला संध्याकाळी लाल रंगाच्या मंगळ ग्रहाचे जवळ पुनर्वसु नक्षत्रात चंद्रा सोबत स्वर्गद्वारावर पाहता येईल. १ ला वृषभ राशीतील रोहिणी व गुरु ग्रह आणि शुक्र व नेपच्यून यांची युती, २ ला चंद्र पृथ्वीच्या जवळ, ९ ला बुध, सूर्य आणि पृथ्वी एका रेषेत व ११ रोजी बुध ग्रह कुंभ राशीत तर १२ ला सूर्य कुंभ राशीत प्रवेश करेल, असे दोड म्हणाले.

### आंतरराष्ट्रीय अवकाश संशोधन केंद्राचे दर्शन

आंतरराष्ट्रीय अवकाश संशोधन केंद्र फिरत्या चांदणीच्या स्वरूपात १ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६.३९ ते ६.४३ या वेळी उत्तरेकडून पूर्वेस, २ फेब्रुवारीला रात्री ७.२६ ते ७.३१ या वेळी वायव्य ते दक्षिण आकाशात आणि ३ रोजी संध्याकाळी ६.३७ ते ६.४३ या वेळेस वायव्य ते आग्नेय दिशेला आकाश मध्यातून जातांना नुसत्या डोळ्यांनी चांगल्या प्रकारे पाहता येईल, असे देखील प्रभाकर दोड म्हणाले. सध्या स्थितीत सुनीता विल्यम्स त्या अवकाश केंद्रात आहेत.

## संतनगरी शेगावात दोन क्विंटल गांजा जप्त, एक आरोपी जेरबंद

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०शेगाव**

संतनगरी शेगावात आज अंमली पदार्थाचा मोठा साठा जप्त करण्यात आला. शेगाव पोलिसांनी तब्बल दोन क्विंटल गांजा जप्त केला आहे. या कारवाईत शेगाव पोलिसांनी ४२ लाख रुपयांचा गांजा, दुचाकी आणि मोबाइल जप्त केले. गांज्याचे बाजार मूल्य एक्केचाळीस लाख चाळीस हजार इतके असल्याने विदर्भ पंढरीसह पोलीस विभागही हादरलाय! शेगाव नगरीतील कचरा डेपो (डंपिंग ग्राउंड) परिसरात आज ही कारवाई करण्यात आली. यावेळी पोलिसांनी एका आरोपीस ताब्यात



घेतले असून एक आरोपी पसार होण्यात यशस्वी झाला आहे. डोंगरसिंग जुलालसिंग झाडे (४७, रा. कुऱ्हा, ता. मोताळा, जि. बुलढाणा) असे जेरबंद करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. प्रकरणी शेगाव शहर पोलिसांनी एन.डी.पी.एस. कायद्याच्या कलम ८(सी), २० (ब) (ii) (सी), २२ (सी) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

संपादकीय ......

# समान नागरी कायदा लागू; मुख्यमंत्री धामींचा

उत्तराखंड राज्यामध्ये समान नागरी कायद्याची सोमवारपासून अंमलबजावणी करण्याचा निर्णय भाजपाप्रणीत सरकारने घेतला. असा कायदा लागू करणारे उत्तराखंड हे देशातील पहिले राज्य ठरले आहे. समान नागरी कायद्यामुळे त्या राज्यातील सर्वधर्म आणि जातींच्या लोकांसाठी एकच कायदा असणार आहे. समान नागरी कायदा या विषयावरून आपल्या देशात गेली अनेक वर्षे चर्चा, वादविवाद सुरू होतो. या कायद्याच्या समर्थनातील लोकांचे नेहमीच म्हणणे असायचे की, देशात राहणारे लोक कुठल्याही धर्माचे, पंथाचे असू दे. सर्वांना समान न्याय व समान कायदा असावा. भारतीय राज्य घटनेतील कलम १४ प्रमाणे सर्व नागरिक कायद्यासमोर समान आहेत.

शासन संस्थेला कोणत्याही नागरिकांस कायद्यातील समानता व कायद्याचे समान संरक्षण नाकारता येणार नाही. याशिवाय घटनेतील कलम १५ नुसार शासनसंस्थेला कोणत्याही नागरिकांमध्ये धर्म, वंश, जात, लिंग या आधारे भेद करता येणार नाही, अशी राज्यघटनेत तरतूद असतानाही, भारतात समान नागरी कायद्यावरून विरोध करणारा मोठा समूह आजही आहे, हे नाकारता येत नाही.तरीही अशा स्थितीत गेल्या वर्षी ७ फेब्रुवारी रोजी उत्तराखंड विधानसभेने समान नागरी कायदा मंजूर केला होता. त्याची अंमलबजावणी आणि नियम तयार करण्यासाठी स्थापन केलेल्या गठीत समितीने १८ ऑक्टोबर २०२४ रोजी आपला अहवाल सादर केला होता. त्यानुसार हा कायदा लागू करण्यात आला. हा कायदा लागू झाल्यानंतर आता राज्यात विवाह, लिव्ह-इन रिलेशनशिप आणि वारसा हक्कासंबंधी काही नियम बदलले आहेत. ७५० पानांच्या मसुद्यात लग्नासाठी मुलीचे वय १८ वर्षे आणि मुलाचे वय २१ वर्षे असणे आवश्यक असणार आहे. तसेच, लिव्ह-इन रिलेशनशिपमध्ये राहणाऱ्यांसाठी एक महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. लिव्ह-इन रिलेशनशिपमध्ये राहण्यासाठी आता पालकांची परवानगी आवश्यक असेल. तसेच त्या जोडप्याला लिव्ह-इन रिलेशनशिपमध्ये राहत असल्याची माहिती रजिस्ट्रारला द्यावी लागणार आहे. तसे न केल्यास १० हजारांचा दंड लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्याचप्रमाणे, प्रत्येक धर्माला आपापल्या चालीरीतींनुसार विवाह करण्याचा अधिकार आहे; परंतु विवाहाची नोंदणी आवश्यक आहे. यूसीसी कायद्यानुसार, ६० दिवसांच्या आत लग्नाची नोंदणी करणे आवश्यक आहे. घटस्फोट आणि वारसांमध्ये समानता आणली आहे. सर्व धर्माचे लोक आपापल्या चालीरीतींचे पालन करू शकतात. यामध्ये कोणतेही बदल केले जाणार नाहीत. इस्लाममध्ये प्रचलित असलेल्या हलाला प्रथेवर समान नागरी कायद्यात बंदी घालण्यात आली आहे. उत्तराखंडमध्ये राहणारे मुस्लीम लोक हलाला प्रथा पाळू शकत नाहीत. बहुपत्नीत्वावरही बंदी आली आहे. या कायद्याद्वारे, विवाहाप्रमाणे, घटस्फोटाची नोंदणी देखील आवश्यक आहे, जी वेब पोर्टलद्वारे केली जाऊ शकते. सर्व धर्मांना मूल दत्तक घेण्याचा अधिकार आहे; परंतु स्वतःच्या धर्माचे मूल दत्तक घेतले जाऊ शकते. दुसऱ्या धर्माचे मूल दत्तक घेण्यावर बंदी आहे. सर्व समुदायांमध्ये, मुलगा आणि मुलगी यांना वडिलांच्या मालमत्तेत समान अधिकार मिळेल. नैसर्गिक संबंध किंवा लिव्ह-इन रिलेशनशिपमध्ये जन्मलेल्या मुलांचाही मालमत्तेत हक्क समजला जाईल, असे या नव्या कायद्यात नमूद केले आहे. एखाद्या व्यक्तीच्या मृत्यूनंतर पत्नी आणि मुलांसह आई-वडिलांनाही मालमत्तेत हक्क मिळणार आहे. मालमत्तेबाबत कोणताही वाद उद्भवल्यास मृत व्यक्तीच्या मालमत्तेत पत्नी, मुले आणि पालकांना समान हक्क मिळेल.घटनेच्या कलम ३४२ मध्ये नमूद केलेल्या अनुसूचित जमातींना समान नागरी कायद्याच्या बाहेर ठेवण्यात आले आहे. या जमातींना त्यांच्या प्रथा आणि परंपरांच्या रक्षणासाठी यूसीसीच्या बाहेर ठेवण्यात आले आहे.

भारतात आज मुस्लीम, ख्रिश्चन आणि पारशी समाजासाठी स्वतंत्र पर्सनल-लॉ आहेत, तर हिंदू सिव्हिल-लॉ अंतर्गत हिंदू शिख, जैन आणि बौद्ध समाज येतात. मुस्लीम पर्सनल-लॉमध्ये महिलांना वडिलांच्या किंवा पतीच्या संपत्तीवर तेवढा अधिकार नाही, जेवढा हिंदू सिव्हिल - लॉनुसार महिलांना आहे. समान नागरी कायदा लागू झाल्यास लग्न, तलाक आणि संपत्तीचे वाटपही समसमान होईल आणि हीच मोठी अडचण विशिष्ट धर्मीयांना वाटत आहे. भारताच्या राज्यघटनेनुसार दोन भागांत कायद्यांचे वर्गीकरण केले गेले आहे. नागरी कायदे आणि गुन्हेगारी कायदे. लग्न, संपत्ती, वारसदार यांसारखे कुटुंब किंवा व्यक्तीशी संबंधित प्रकरणे नागरी कायद्याअंतर्गत येतात. घटनेतील कलम ४४ अन्वये समान नागरी कायदा लागू करण्याची जबाबदारी राज्यांची आहे. मात्र, यावरून कायमच वाद सुरू असतो आणि त्यामुळेच आतापर्यंत यावर कुठलेही मोठे पाऊल उचलले गेले नाही. दक्षिण भारत, ईशान्य भारतात आदिवासी भाग मोठ्या संख्येने येतो. भारतात सर्वत्र लग्न परंपरा वेगवेगळ्या आहेत. वारसा हक्काच्या परंपरा सुद्धा भिन्न व वेगवेगळ्या आहेत.

# 'रेशीम शेतीची आस धरा, लक्ष्मी येईल तुमच्या घरा...

आपल्या देशात रेशीम धाग्याची मागणी जास्त असून उत्पादन कमी असल्याने रेशीम धागा इतर देशातून आयात करावा लागतो. त्यामुळे रेशीम उत्पादन वाढविण्यास आपल्याला चांगला वाव आहे. तुती रेशीम उद्योग हा प्रामुख्याने महाराष्ट्रातील २७ जिल्ह्यांमध्ये चालू आहे. टसर रेशीम उद्योग प्रामुख्याने पूर्व विदर्भातील भंडारा, गोंदिया, गडचिरोली व चंद्रपूर या जिल्ह्यात पारंपारिक पद्धतीने चालू असून यातून आदिवासी भागातील शेतकऱ्यांना उत्तम जोडधंदा लाभला आहे.नैसर्गिक रेशीम धाग्याला त्याच्या मुलायमप्रमाणे 'वस्त्रोद्योगाची राणी' असे संबोधण्यात येते. रेशीम कोष उत्पादन झाल्यानंतर त्यापासून रेशीम धागा निर्मिती करुन वस्त्र निर्मिती केली जाते. शासनामार्फत या योजनेचा विस्तार व विकासासाठी अनेक योजना राबविण्यात येत आहेत. शेतीसाठी असलेल्या विविध योजनांचा लाभ घेऊन त्यांचे आर्थिक उत्पन्नात भर पडावी हा या प्रकल्पाचा मुख्य उद्देश आहे. शासनाच्या वस्त्रोद्योग विभागामार्फत व रेशीम संचालनालय, नागपूर यांचे मार्गदर्शनाखाली हा प्रकल्प राबविण्यात येत आहे.

नैसर्गिक रेशीम धाग्याची निर्मिती रेशीम अळीच्या कोषापासून होते. निसर्गात ४ प्रकारच्या रेशीम अळ्या आढळतात. मोठ्या प्रमाणावर तुती रेशीम कोष उत्पादन घेण्यासाठी तुतीच्या झाडांची सलग लागवड करावी लागते. तुतीच्या झाडांची पाने खाऊ घालून रेशीम कोष उत्पादन करणे याला 'रेशीम शेती' म्हणतात. हा एक कुटीर उद्योग असून शेतीला उत्तम पूरक जोडधंदा आहे. रेशीम अळ्यांचे संगोपन हे संगोपन गृहामध्ये करावयाचे असते. याकरिता संगोपन साहित्य व आदर्श पक्के संगोपन गृह बांधणे आवश्यक आहे.

रेशीम कोष उत्पादन व्यवसाय हा महत्त्वपूर्ण आहे कारण शेतीला उत्कृष्ट जोडधंदा आहे. अल्प कालावधीचे पीक असल्यामुळे पाल्याचे योग्य व्यवस्थापन केल्यास दुसऱ्या वर्षापासून वार्षिक किमान पाच पिके घेता येतात. तुती लागवड केल्यानंतर १०ते १५ वर्षापर्यंत पुन्हा लागवड करण्याची गरज नाही. तुतीच्या फांद्या व अळ्यांच्या विष्ठेपासून उत्तम सेंद्रिय खत निर्मिती करता येते. घरातील व्यक्तीद्वारे सहज व सुशिक्षित बेरोजगार यांनी करण्यासारखा उद्योग आहे. इतर पिकांच्या तुलनेत पाणी कमी लागते. या व्यवसायात महिलांचा ५० ते ६० टक्के सहभाग आहे. शिवाय पर्यावरण पुरक व्यवसाय आहे.

**अपर्णा यावलकर**
माहिती अधिकारी,अमरावती



करा रेशीम शेती, पिकवा मातीतून मोती...*

रेशीम कोष खरेदी किमान आधारभूत किंमत व इतर राज्यात विकण्यास सुद्धा मुभा आहे. शिवाय तुतीचा शिल्लक पाला जनावराचे उत्तम खाद्य आहे. विद्यावेतनासह रेशीम शेती प्रशिक्षण, तांत्रिक मार्गदर्शन व सवलतीचे दरात अंडीपूंज पुरवठा देखील करण्यात येतो. रेशीम कोष उत्पादन करणेसाठी शेतकऱ्यांकडे किमान एक एकर उत्तम पाण्याचा निचरा होणारी व बारमाही ओलीत असलेली जमीन असणे आवश्यक आहे. मात्र तुतीची लागवड इतर पिकांमध्ये करु नये. दुसऱ्या वर्षापासून ५०० ते ६००किलो कोषचे दिड ते दोन लाख रुपयांचे उत्पन्न मिळते. ४०ते ५० हजार पर्यंत खर्च येतो. म्हणजेच १ लाख ते १.५ लाख रुपये निव्वळ नफा एक एकर पासून मिळवता येतो.

नुकतेच जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी रेशीमरथाला हिरवी झेंडी दाखवून महारेशीम अभियान-२०२५ चे उद्घाटन केले. रेशीमरथाचा उद्देश तुती रेशीम उद्योग, रेशीम शेतीचे महत्त्व व त्यातून मिळणाऱ्या हमखास व शाश्वत उत्पन्नाची शेतकऱ्यांना माहिती हवी तसेच शेतकऱ्यांना रेशीम शेतीसाठी नोंदणी करता यावी, यासाठी जनजागृती व्हावी, हा होय. चित्ररथाव्दारे अमरावती जिल्ह्यातील १४ तालुक्यातील ७८ गावात रेशीम उद्योगाचा प्रचार व प्रसिद्धी मोहीम तसेच नवीन गावे व शेतकरी निवड व नोंदणी कार्यक्रम राबविण्यात येत आहे. तुती रेशीम उद्योग हा शेतीला उत्तम जोडधंदा आहे. जास्तीत -जास्त शेतकऱ्यांनी रेशीम शेतीचे महत्त्व जाणून तुती रेशीम उद्योग करण्यावर भर द्यावा.




## 'हा' पदार्थ आहे खूपच दुर्लक्षित; पण निरोगी दिर्घायुष्यासाठी ठरतो उपयुक्त! बघा नेमकं काय

**दि.३० विदर्भ प्रजासत्ताक**
आपल्या स्वयंपाक घरात असे अनेक पदार्थ असतात जे खूप उपयुक्त आहेत हे आपल्याला माहिती असतं, पण तरीही आपण ते खूपच कमी प्रमाणात खातो. असाच एक पदार्थ म्हणजे रताळी. रताळी आरोग्यासाठी अतिशय उपयुक्त आहेत, हे आपण जाणतो. पण तरीही उपवासाचा दिवस वगळता अन्य दिवशी आपण कधीही रताळी खात नाही. काही जण तर उपवासालाही रताळी खात नाहीत.



खूपच कमी लोक असे असतील जे बाजारातून इतर भाज्यांसोबत अगदी आवर्जून रताळे घेऊन येतात. म्हणूनच रताळे खाण्याचे हे काही फायदे बघा आणि नियमितपणे रताळे खाण्यास सुरुवात करा.

हेल्थ लाईन यांनी दिलेल्या माहितीनुसार रताळ्यांमध्ये भरपूर व्हिटॅमिन्स असतात आणि काही एंटी कॅन्सर घटकही आढळून येतात. रताळ्यांमध्ये एंटीऑक्सिडंट्स भरपूर प्रमाणात असतात त्यामुळे एजिंग प्रक्रिया हळूवार करण्यासाठीही त्यांचा उपयोग होतो.

शिवाय रताळ्यामध्ये असे काही घटक असतात जे हृदयाचे आरोग्य उत्तम ठेवण्यासाठी मदत करतात. रताळ्यांमध्ये भरपूर प्रमाणात फायबर असतात. त्यामुळे वजन कमी करण्यासाठी प्रयत्न करणाऱ्यांनाही रताळे खाणे उपयुक्त ठरते. मधुमेह असणाऱ्या व्यक्ती तसेच लहान बालकांसाठीही उकडलेले रताळे पोषक ठरतात.

रताळ्यांमधून व्हिटॅमिन ए, व्हिटॅमिन सी, पोटॅशियम, मॅग्नेशियमही भरपूर प्रमाणात मिळते. हल्ली स्क्रिन टाईम वाढल्याने लहान मुलांपासून ते वयस्कर व्यक्तींपर्यंत सगळ्यांच्याच डोळ्यांच्या समस्या वाढल्या आहेत.त्यामुळेच डोळ्यांचे आरोग्य चांगले ठेवणारे रताळे शक्य होईल तेवढे खायलाच हवेत, असंही तज्ज्ञ सांगतात. रताळे जेवढे गुणकारी असतात, तेवढेच गुणकारी त्यांचे सालसुद्धा असते. कारण त्यांच्यामध्ये पचनासाठी मदत करणारे अनेक घटक असतात. त्यामुळे ज्यांना नेहमीच अपचनाचा त्रास होतो, त्यांच्यासाठी रताळी सालींसकट खाणे खूप फायदेशीर ठरते.

# जमिनीतील सेंद्रिय कर्ब वाढविण्याचे सोपे उपाय

**दि.३०विदर्भ प्रजासत्ताक**
सेंद्रिय कर्बाचे पिकाच्या दृष्टीने फायदे सेंद्रिय कर्ब जास्त असलेल्या जमिनीत उपयुक्त जिवाणूंची संख्या अधिक असते. परिणामी पिकांना अन्नद्रव्यांची उपलब्धता अधिक होते.अशा जमिनीत सेंद्रिय पदार्थ अधिक असल्यामुळे जमिनीची भौतिक सुपीकताही लक्षणीय प्रमाणात सुधारते. जमिनीची जलधारणाशक्ती, पोत सुधारतो, त्यामुळे क्षारांचा निचरा होण्यास मदत होते.

जमिनीत हवा खेळती राहिल्याने मुळांची निरोगी, जोमदार वाढ होते. जमिनीचा सामू अधिक असल्यास तो कमी होण्यास मदत होते. जीवाणूद्वारे सेंद्रिय आम्ले सोडली जातात.

या आम्लांमुळे रासायनिक अभिक्रिया वाढून स्थिर झालेली सेंद्रिय व रासायनिक अन्नद्रव्येही पिकांना उपलब्ध होऊ लागतात म्हणून सेंद्रिय कर्बाची पातळी वाढवणे जमिनीच्या जैविक, भौतिक आणि रासायनिक सुपीकतेसाठी महत्त्वाचे ठरते.

**सेंद्रिय कर्ब वाढवण्याच्या उपाययोजना**

जमिनीत सेंद्रिय खतांचा पुरेसा पुरवठा करणे हा सेंद्रिय कर्ब वाढविण्याचा रामबाण उपाय आहे. उदा. शेणखत, कंपोस्ट खत, गांडूळ खत, कोंबडी खत, प्रेसमड केक, हिरवळीची पिके, अखाद्य पेंडी (निंबोळी पेंड, करंज पेंड, सरकी पेंड इत्यादी)




पीक फेरपालट करताना कडधान्य पिकांची लागवड करावी.

शिफारशीप्रमाणे दरवर्षी सेंद्रिय खत शेवटच्या कुळवाच्या पाळीआधी जमिनीत मिसळावे.




विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष

क्षारपड जमिनीत धैंचा किंवा ताग जमिनीत पेरून दीड महिन्यात गाडावा.

**उभ्या पिकांत निंबोळी पेंडीचा वापर करावा.**

पीक अवशेषांचा आच्छादन म्हणून वापर करावा. उदा. खोडवा उसाचे पाचटाचे नियोजन करावे आंतरपीक पद्धतीमध्ये कडधान्य पिकांचा समावेश करावा.

शेतीची पशुसंगोपनासोबत सांगड घालावी.

एक सेंद्रिय खत उपलब्ध नसेल तर दुसऱ्या सेंद्रिय खताचाच पर्याय योग्य ठरतो. उदा. उसाचे पाचट न जाळता शेतातच कुजवणे.

पिकांची फेरपालट करून नत्र स्थिरीकरण करणारी पिके घेणे जमिनीस आवश्यक विश्रांती दिल्यावरही सेंद्रिय कर्ब टिकण्यास मदत होते.

पिकांसाठी रासायनिक, जैविक आणि सेंद्रिय खतांचा संतुलित वापर करावा.

पिकांच्या गरजेनुसारच पाण्याचा वापर करावा.

निसर्गातील सेंद्रिय पदार्थ हे जमिनीच्या दृष्टीने मोलाचे असतात. उदा. शेतातील काडीकचरा, पिकाचे अवशेष इत्यादी पासून सेंद्रिय खत करून वापर करावा हिरवळीच्या पिकांचा (उदा. ताग, धैंचा, चवळी इत्यादी) सेंद्रिय कर्ब वाढण्यास खूप फायदा होतो. पीक पद्धतीत या पिकांचा आवर्जून समावेश करावा. योग्य वेळी ती जमिनीत गाडावीत.

जमिनीत जिवामृत, व्हर्मिवॉश यांचाही वापर करावा.


पीक पद्धतीमध्ये एकच पीक सातत्याने घेऊ नये. त्यात वेळोवेळी बदल करावेत.

आपण पिकाच्या अधिक उत्पादनक्षम जाती निवडत असल्यामुळे त्यांच्या पोषकतेचाही व्यवस्थित विचार करावा. सेंद्रिय खतात सर्व प्रकारची अन्नद्रव्ये अल्प प्रमाणात असतात. या व्यतिरिक्त वेगवेगळी विकरे (एन्झाइम्स), संप्रेरके (हार्मोन्स) आणि जीवनसत्त्वे (व्हिटॅमिन्स) उपलब्ध असतात. यामुळे उत्पादनाचा दर्जा (उदा. गोडी, रंग इत्यादी) आणि रोग, कीड प्रतिकारकशक्ती वाढते.सेंद्रिय कर्ब जमिनीच्या वरच्या थरात अधिक असून, या थराची धूप होणार नाही याची काळजी घ्यावी.

अशा प्रकारे जमीन आणि पीक व्यवस्थापनामध्ये सेंद्रिय कर्ब वाढीचा गांभीर्याने विचार करून आपण सेंद्रिय कर्बाचे प्रमाण वाढवू शकतो.

# वहीरीत आढळले मृत बिबट व सांबर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०मेळघाट-**
मेळघाटातील व्याघ्र प्रकल्पातील गुगामल वन्यजीव व चिखलदरा वर्तुळ, नियतक्षेत्र चुर्णी, वनखंडातील एका विहीरीत ही घटना उघडकीस आली. सोमवारी सकाळी साडे दहा वाजताचे सुमारास एका विहीरीत एक बिबट मादी व एक सांबर मृत अवस्थेत आढळून आले. वन कर्मचार्यांनी ही बाब लक्षात येताच त्यांनी वरिष्ठ अधिकार्यांना माहीती दिली. घटनास्थळी वन अधिकारी व वनकर्मचारी यांनी भेट दिली. यावेळी बिबट मादी व सांबर विहीरीत दोरीने बांधलेल्या अवस्थेत होते. मृत प्राण्यांचे नखे, मिशा, दात व इतर अवयव साबूत असल्याचे आढळले.



गुगामल वन्यजीव विभागाच्या उपवनसंरक्षक दिव्या भारती, सहायक वनसंरक्षक गुगामल वन्यजीव विभाग रामानुज बांगड, वनपरिक्षेत्र अधिकारी चिखलदरा राहुल धाईत यांच्या उपस्थितीत पशुधन विकास अधिकारी डॉ. वैभव हागोणे, डॉ. पंकज भोपसे, डॉ. अक्षय मेश्राम, डॉ. चंद्रकांत धंदर यांनी शवविच्छेदन केले. प्रकरणाचा पुढील तपास वनविभाग करीत आहेत.

# जानेवारी-फेब्रुवारी काळात डाळिंब पिकाची अशी घ्या काळजी

**दि.३०विदर्भ प्रजासत्ताक**
डाळींबाच्या झाडास आंबिया बहार, मृग बहार, हस्तबहार असे तीन बहार येतात. यापैकी कोणत्याही एका बहाराची फळे घेणे फायदेशीर असते. आंबिया बहार धरणे अधिक चांगले कारण फळांची वाढ होताना व फळे तयार होताना हवा उष्ण व कोरडी राहते. त्यामुळे फळास गोडी येते. दरम्यान जानेवारी आणि फेब्रुवारी हा काळ बहार येण्याचा काळ असतो. या काळात डाळींब पिकाची काळजीकशी घ्यावी, हे समजून घेऊया....

**नवीन पालवी फुटण्याची अवस्था**

पहिले पाणी दिल्यानंतर १० ते १५ दिवसांनी निळे किंवा पिवळे चिकट सापळे २५ ते ३० सापळे प्रती एकर याप्रमाणे झाडाच्या सर्वात उंच फांदीपासून १० ते १५ सें.मी. खाली बांधावे. हे सापळे चिकटलेल्या किडीनुसार २० ते २५ दिवसांनी बदलावेत.




**वाढीची अवस्था**

ॲझाडिरॅक्टिन / कडुनिंब तेल १% (१०,००० पीपीएम) ३ मिली किंवा करंज तेल ३ मिली किंवा वरील दोन्ही तेलांचे मिश्रण प्रत्येकी ३ मिली प्रति लिटर पाणी याप्रमाणे आवश्यकतेनुसार ७ ते १० दिवसांच्या अंतराने एक-दोन फवारण्या घ्याव्यात.

**फुलधारणा / फुलकळी येण्याची अवस्था**

७ ते १० दिवसांच्या अंतराने सायअँट्रानिलीप्रोल (१०.२६ ओडी) ०.९ मिली किवा क्लोरअँट्रानिलीप्रोल (१८.५ एससी) ०.३ मिली किंवा फ्लुबेन्डीमाइड अधिक थायक्लोप्रिड (४८० एससी) ०.५ मिली अधिक स्टीकर स्प्रेडर ०.२५ मिली लिटर पाणी याप्रमाणे एक-दोन फवारण्या घ्याव्यात.

**- ग्रामीण कृषी मौसम सेवा आणि विभागीय संशोधन केंद्र, इगतपुरी**

RNI No. - MAHMAR 2023/84526
Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

कोणत्याही शंका किंवा अभिप्रायासाठी आम्हाला ईमेल करा -prajasattaknews24gmail.com
या पृष्ठावरील जाहिरातींसाठी किंवा मोफत अंक मो.वर मिळण्यासाठी संपर्क मो.८६२४९८५६३३, प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

गुरुवार दि. ३० जानेवारी २०२५

शहर/ग्रामिण




# ५२ व्या राज्यस्तरीय बालवैज्ञानिक प्रदर्शनाचे दिमाखदार उद्घाटन

## राज्यभरातून तब्बल ३३० विद्यार्थ्यांचे आणि १११ शिक्षक व प्रयोगशाळा सहायकांचे प्रयोग प्रकल्प सादर



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अमरावती** – येथे आयोजित ५२ व्या राज्यस्तरीय बालवैज्ञानिक प्रदर्शनाचे उद्घाटन राज्यसभा सदस्य खा. डॉ. अनिल बोंडे यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी श्री. शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख होते. या सोहळ्याला खासदार बळवंत वानखडे, आमदार किरण सरनाईक, तसेच विभागीय



उपसंचालक (माध्यमिक) नीलिमा टाके यांची विशेष उपस्थिती होती.

श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालयाच्या प्रांगणात उभारलेल्या डॉ. पंजाबराव देशमुख विज्ञान नगरीमध्ये राज्यभरातून आलेले ३३० विद्यार्थी आणि १११ शिक्षक, तसेच प्रयोगशाळा सहाय्यक यांनी आपले नाविन्यपूर्ण संशोधन व प्रयोग सादर केले. या प्रदर्शनामध्ये विविध विज्ञान व गणित प्रकल्पांचे आकर्षक प्रदर्शन मांडण्यात आले आहे.

उद्घाटन समारंभाच्या प्रारंभी महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या रोबोद्वारे पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले, ही एक अनोखी वैज्ञानिक संकल्पना ठरली.राज्य विज्ञान शिक्षण संस्था, नागपूरच्या संचालक हर्षलता बुराडेम यांनी प्रास्ताविक केले. त्यानंतर डॉ. जी. व्ही. कोरपे यांनी अभिवादन केले, तर दिलीपबाबू इंगोले यांनी स्वागतपर भाषण दिले. राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेचे प्रतिनिधी पुनीत शर्मा यांनी या प्रदर्शनाच्या उद्दिष्टांची सविस्तर माहिती दिली.प्रदर्शनाचा लोगो अत्याधुनिक ड्रोन तंत्रज्ञानाच्या सहाय्याने सभामंडपात झळकवण्यात आला. तसेच डीबीटी स्टार कॉलेज प्रोजेक्टसंवाद साधताना खा. बोंडे. हर्षवर्धन देशमुख, दिलीपबाबू इंगोले,आणि पी. एम. उषा योजना अंतर्गत महाविद्यालयात नियोजित उपक्रमांची विशेष दिनदर्शिकाही अनावरण करण्यात आली.उद्घाटनप्रसंगी खा. डॉ. अनिल बोंडे यांनी बालवैज्ञानिकांनी केलेल्या सादरीकरणाचे आणि शिक्षकांनी तयार केलेल्या नाविन्यपूर्ण शैक्षणिक साहित्याचे कौतुक केले. त्यांनी २१ वे शतक हे भारताच्या विज्ञान व तंत्रज्ञानाच्या प्रगतीचे असून, भारतीय तरुणांना जागतिक स्तरावर मोठ्या संधी उपलब्ध होतील, असे प्रतिपादन केले. त्यांनी भारताच्या वैज्ञानिक परंपरेचे महत्त्व अधोरेखित केले आणि शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या योगदानाची आठवण करून दिली.खासदार बळवंत वानखडे यांनी या भव्य प्रदर्शनामुळे समाजात वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित होण्यास मदत होईल, असे मत व्यक्त केले. आमदार किरण सरनाईक





यांनी विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा उपयोग मानवी कल्याणासाठी व्हावा, याकडे लक्ष वेधले.अध्यक्षीय भाषणात हर्षवर्धनदेशमुख यांनी आजच्या बालकांनी उद्याचे जबाबदार, विज्ञाननिष्ठ आणि उर्जावान तरुण बनून राष्ट्राच्या प्रगतीत योगदान द्यावे, असे आवाहन केले. श्री शिवाजी शिक्षण संस्थेला या भव्य आयोजनाची संधी दिल्याबद्दल त्यांनी महाराष्ट्र शासनाचे आणि सर्व शैक्षणिक संस्थांचे आभार मानले. नीलिमा टाके यांनी उपस्थित मान्यवरांचे आभार मानले. समारंभाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली.उद्घाटन सोहळ्यानंतर विद्यार्थ्यांसाठी सायन्स टॉक्स या विशेष परिसंवादाचे आयोजन करण्यात आले. यामध्ये टाटा इन्स्टिट्यूट ऑफ फंडामेंटल रिसर्चचे डॉ. विवेक पोलशेट्टीवार, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे डॉ. प्रकाश इटनकर आणि महिला महाविद्यालय, अमरावतीचे डॉ. अविनाश मोहरील यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. पुढील पाच दिवस या प्रदर्शनात विद्यार्थ्यांना विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रातील नवीन संशोधनांचा अनुभव घेता येईल. दररोज विविध वैज्ञानिक प्रयोग, नवकल्पना आणि शैक्षणिक प्रकल्पांचे सादरीकरण होणार आहे.–

# चांदूर बाजार बोर्डी नाला प्रकल्प उपविभाग कार्यालय वाऱ्यावर

## कामकाजाच्या वेळी झोपण्याची व्यवस्था,काही कर्मचारी मध्यधुंद अवस्थेत?

### तर, सहाय्यक अभियंता यांच्या सह कर्मचारी दांडी मारतात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०चांदुर बाजार**– चांदूर बाजार बोर्डी नाला प्रकल्प उपविभाग-क्र १ कार्यालय वाऱ्यावर असून शेतकऱ्यांच्या व सर्व सामान्यांच्या कामाला रोख लागली आहे पाच दिवसांचा आठवडा होऊनही कामकाजाच्या वेळी कार्यालयात अनेक जण दांडी मारतात चांदूर बाजार येथील बेलोरा रोड संत जगनाडे महाराज मंदिरा च्या मागे स्थित असलेल बोर्डी नाला प्रकल्प कार्यालय असून त्यात दुपारनंतर अनेक टेबलवरील कर्मचारी गायब असतात शासकीय कर्मचाऱ्यांना पाच दिवस कामकाजाचे करण्यात आले असूनही अनेकजण कामाऐवजी बाहेरच असतात तर काही कर्मचारी कामकाजाच्या वेळी बियर बार मध्ये बसतात व याबाबत माहिती घेतली असता सकाळी येताना अनेकजण उशिरा येतात तर दुपारी बाहेर गेलेले अनेक कर्मचारी दुसऱ्या दिवशीच कार्यालयात येत असल्याचे समजले यासह सहाय्यक अभियंता मावळे सुद्धा दांडी मारतात मुख्यालयी न राहता ते अमरावती किंवा,नेर पिंगळाई येथून ये-जा करतात त्यामुळे शासनाची शुद्ध फसवणूक देखील होत आहे व त्यांचे कार्यालयावर नियंत्रण नसल्याच चित्र दिसत आहे.

### कार्यलयात जुगार व झोपण्याची व्यवस्था!

सदर कार्यलयात झोपण्याची सुद्धा व्यवस्था केली आहे कर्मचारी टेबलवर बसत नसून दिवानावर झोप घेतात यासह कार्यालयात ५२ पत्यांचा कॅट सुद्धा आढळला असून जुगार सुद्धा कार्यलयात चालतो याकडे पोलीस विभागाने लक्ष द्यावे.



### कार्यालयातील बायोमेट्रिक यंत्र नाहीच!

शासकीय कामकाजात कसलीही दिरंगाई होऊ नये प्रामाणिकतेने सर्व कर्मचार्यांनी कार्यालयात काम करावे या उद्देशाने शासनाने बायोमेट्रिक पद्धत अंमलात आणली मात्र ही पद्धत या कर्यालयात कामचुकार कर्मचार्यांवर लगाम लावण्यात कुचकामी ठरली आहे.

### हालचाल रजिस्टर नावालाच,कार्यालय सुनेसूने

कार्यालयातील कर्मचाऱ्यांना कामकाजाच्या वेळेत कार्यालय सोडावयाचे असेल किंवा यायच असेल तर त्याची 'हालचाल' रजिस्टरमध्ये नोंद आवश्यक असते मात्र बोर्डी नाला प्रकल्प उपविभाग कार्यालय चांदूर बाजार येथे होत नाही.

# दहावी, बारावी परीक्षा बोर्डाने 'तो' तुघलकी निर्णय मागे घ्यावा

## राज्य शिक्षक संघातर्फे शनिवारी बोर्डासमोर धरणे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अमरावती**– दहावी बारावी बोर्ड परीक्षांसाठी केद्रसंचालक, वर्यवेक्षक तसेच परीक्षेसंबंधी इतर कामांसाठी न्या शाळेत परीक्षा केंद्र आहे त्या शाळेच्या परीक्षा आस्थापनेवरील शिक्षक वे शिक्षकेतर कर्मचारी न घेता दुसऱ्या शाळेतील शिक्षक व कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली जावी या पेर्डाच्या ऐनवेळेवरील आदेशाला ख्याध्यापक संघटनांसह शिक्षक व नक्षकेतर संघटनांनी जोरदार विरोध केला हे. हा तुघलकी निर्णय तात्काळ रद्द रण्यात यावा, या मागणीसाठी राज्य शिक्षक चातर्फे येत्या शनिवारी १ फेब्रुवारी रोजी परी ३ ते ५ वाजताच्या दरम्यान अमरावती भागीय परीक्षा मंडळ कार्यालय, टोपे नगर, नरावती येथे धरणे आंदोलन करण्यात येणार हे. मुख्याध्यापक संघानेसुद्धा याराज्य शिक्षक संघआंदोलनास पाठिंबा दर्शविला आहे.राज्य शिक्षक संघाचे अध्यक्ष दिलीप कडू यांच्या वतीने संघाचे सरचिटणीस भोजराज काळे यांनी जारी केलेल्या पत्रकानुसार बोर्ड राबवित असलेल्या कॉपीमुक्त अभियान सप्ताहाचे सर्व शिक्षक तथा शिक्षकेतर कर्मचारी स्वागत करीत आहेत व हे अभियान राबविण्यात मदतसुद्धा करीत आहेत. पण बोर्ड परीक्षेचे केंद्र असलेल्या शाळेतून केंद्रसंचालक, पर्यवेक्षक न नेमता त्यांना अन्यत्र पाठविणे व दुसऱ्या शाळेतील शिक्षक कर्मचाऱ्यांना केंद्रावर नियुक्त करणे हा जो निर्णय परीक्षा मंडळाने घेतला आहे तो निर्णय तुघलकी असून ऐन परीक्षांच्या तोंडावर घेतल्यामुळे परीक्षा घेणाऱ्यांची तारांबळ उडणार आहे. बाहेरून येणाऱ्या केंद्रसंचालक व पर्यवेक्षकांना केंद्राची भौगोलिक परिस्थिती, स्थानिक अडचणी तसेच आवश्यकता याची कोणतीही माहिती असणार नाही, त्यामुळे ते परीक्षा नीट व व्यवस्थितपणे हाताळू शकणार नाहीत. शिवाय त्यांचा आत्मविश्वास कमी पडेल. आपल्या शाळेतील व्यवस्था व मर्यादांची जी जाण स्थानिक शिक्षकांना असते ती दुसऱ्या शाळेतील शिक्षकांना असणार नाही. परिणामी परीक्षेचे नियोजन व व्यवस्थापन अचूकपणे करणे त्यांना जमणार नाही. अशावेळी परीक्षा केंद्रावर गोंधळाची स्थिती निर्माण होऊन त्याचा फटका दहावी बारावीच्या परीक्षार्थी विद्यार्थ्यांना बसू शकतो. गोंधळामुळे यदाकदाचित मुलांचे शैक्षणिक नुकसान झाल्यास जबाबदार कोण, असा सवाल राज्य शिक्षक संघाच्या पत्रकात करण्यात आला असून येत्या शनिवारी अमरावती बोर्ड कार्यालयासमोर धरणे व निदर्शनांची घोषणा करण्यात आली आहे.अमरावती जिल्हा मुख्याध्यापक संघसुद्धा या आंदोलनात सहभागी होणार आहे. शिक्षण विभाग व परीक्षा मंडळाच्या या निर्णयाला असलेला विरोध दर्शविण्यासाठी जिल्ह्यातील मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर बंधूभगिनींनी मोठ्या संख्येत धरणे आंदोलनात सहभागी व्हावे, असे आवाहन राज्य शिक्षक संघाच्या वतीने करण्यात आले आहे.

# मनपा शाळा क्रमांक १४ वडाळी येथे शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३० अमरावती**–

मनपा उच्च प्राथमिक मराठी शाळा क्रमांक १४ वडाळी येथे शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले.या वेळी विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमाने सर्वांचे लक्ष वेधले.

कार्यक्रमाचे मुख्य अतिथी सचिनजी कलंत्री साहेब ,( सन्माननीय आयुक्त महानगरपालिका अमरावती), डॉ.प्रकाशजी मेश्राम साहेब शिक्षणाधिकारी महानगरपालिका शिक्षण विभाग ), पंकज सपकाळ ( सहाय्यक कार्यक्रम अधिकारी) माननीय कु.संध्याताई वासनिक, योगेश पखाले, जावेद सर,( शाळा निरीक्षक मनपा शिक्षण विभाग ) शुभांगी सुने (विषय तज्ञ) होते. बाभूळकर (माजी नगरसेवक) उपस्थित होते .विविध रंगी अतिशय सुंदर असे नृत्य, नाटिका यांचे सादरीकरण विद्यार्थ्यांनी केले. कार्यक्रमात विद्यार्थ्यांसोबत शिक्षकांनीहीं सहभाग घेतला हजारोच्या संख्येने पालकांची उपस्थिती, पालकांचा आणि विद्यार्थ्यांचा उत्साह पाहून आयुक्त



साहेब आणि शिक्षणाधिकारी साहेबांनी शाळेचे कौतुक केले.

माननीय आयुक्त साहेब, माननीय शिक्षणाधिकारी साहेब , शाळेच्या वर्गखोली करिता लोकवर्गणी देणाऱ्या स्त्री रोग तज्ञ माननीय डॉ निधी सोनोने यांचा शाळेच्या वतीने शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

शाळेचे स्नेहसंमेलन हे संपूर्ण वडाळी परिसरासाठी विशेष आकर्षण असते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी, शाळा व्यवस्थापन समिती शाळेच्या मुख्याध्यापिका निलिमा लव्हाळे संपूर्ण शिक्षक व कर्मचारी वृंद यांनी विशेष परिश्रम घेतले.

# धारणीत शेतकऱ्यांचे विज वितरण कंपनीच्या विरोधात जन अधिकार आंदोलन

## युवा नेते मन्ना लाल दारसिंबे महिला रणरागिने गंगा जावरकर यांचे नेतृत्व

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०धारणी**– विज वितरण कंपनीच्या विरोधात आज येथिल उपविभागीय अधिकार्यां च्या कार्यालयावर विजेच्या लपंडावमुळे खेड्यापाड्यात त्रस्त असलेल्या शेतकर्यांनी जन अधिकार शेतकरी आंदोलन करून उपविभागीय कार्यालयावर धडक देवून लेखी निवेदन दिले.शेतकऱ्यांच्या गंभीर मागण्या लक्षात घेऊन मोर्चेकऱ्यांच्या सामोरे जाऊन विज वितरण कंपनीचे अभियंता कुलकर्णी यांनी लेखी आश्वासन दिल्यानंतर हे आंदोलन मागे घेण्यात आले आहे कर्जबाजारी झालेल्या अनेक शेतकऱ्यांनी पुन्हा सावकारी पाशात अडकून रब्बी हंगामातील पिकांची पेरणी केली पण येथे सिंचनाच्या कोणत्याही सोयी उपलब्ध नसल्यामुळे शेतकऱ्यांची सर्व भिस्त रब्बी पिकांना सिंचन करण्यासाठी विज वितरण कंपनीवर होती. पण येन सिंचनाच्या वेळस विजेचा लपंडाव सुरू असल्यामुळे रब्बी पिके हातुन गेल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. रात्री जंगलातील गावात विज उपलब्ध राहत नसल्यामुळे रात्रीच्या अंधारात हिंसक वन्यप्राण्यांचे कडप शेतकऱ्यांची पिके पायदळी तुडवून पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान केले



जात आहे. शेतकऱ्यांच्या गौधनावर आणि मानवावर जिवघेणे हल्ले करीत असल्यामुळे शेतकऱ्यांचा जिव धोक्यात आला आहे. वेळेवर विज पुरवठा उपलब्ध करून देण्याची सर्वकष जबाबदारी विज वितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांची होती. पण ऐन सिंचनाच्या वेळस विज पुरवठा खंडीत राहत असल्यामुळे यंदा खरीप पिकांचे वेळवर सिंचन होऊ शकले नाही. परिणामी शेतकऱ्यांच्या रब्बी पिकांचे मोठे नुकसान झाले असून या आंन्दोलनात जनक्रांन्ती सेनेचे संस्थापक अध्यक्ष मन्ना दारशिबे, गंगा जावरकर, यशवंत मौड, महेंद्र धांडे, विनोद सेलूकर, शालिकराम बेठेकर, यांच्या नेतृत्वाखाली आज करण्यात आलेले आंन्दोलन पाच दिवसात विजेच्या समस्येचे निराकरण करण्यात येईल असे लेखी आंन्दोलन विज वितरण कंपणीचे अभियंता कुलकर्णी यांनी दिल्याने परत घेण्यात आले आहे.





### पाच दिवसांचे लेखी अश्वासन

उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर सुरू असलेल्या आंदोलन स्थळी स्थानिक प्रशासनाकडून तहसीलदार प्रदीप शेवाळे, पोलीस निरीक्षक अशोक जाधव तर वीज वितरण कंपनीकडून मुख्य अभियंता ज्ञानेश कुलकर्णी, उपअभियंता ए.एन. गंटीवार, शाखा अभियंता व इतर कर्मचारी उपस्थित होते. विद्युत वितरण कंपनीकडून आंदोलनकर्त्यांना पाच दिवसांचे लेखी आश्वासन देण्यात आले. दुसरीकडे चार दिवसांमध्ये समस्यांचे निराकरण न झाल्यास पुन्हा एकदा तीव्र ठिय्या आंदोलनाचा इशारा दिला आहे.

# शिक्षणाचा उपयोग स्वतः शिवाय समाज, देशासाठी करावा

## मुख्यकार्यकारी अधिकारी संजीता मोहपात्र यांचे प्रतिपादन



पुष्पप्रदर्शनी, विज्ञान प्रदर्शनीचे



## गर्ल्स हायस्कूलच्या वार्षिक स्नेहसंमेलनाला सुरुवात

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३०अमरावती–**

विद्यार्थ्यांनी स्वप्न पाहिले पाहिजे, ते साध्य करण्यासाठी शिक्षण महत्वपूर्ण आहे. शिक्षणाचा उपयोग स्वतःशिवाय समाज–देशासाठी झाला पाहिजे. असे प्रतिपादन जिल्हा परिषदेच्या मुख्यकार्यकारी अधिकारी संजीता मोहपात्र यांनी केले.

जिल्हा परिषद माध्यमिक कन्या शाळा (गर्ल्स हायस्कूल) कॅम्प अमरावती येथील वार्षिक स्नेहसंमेलन २८ ते ३० जानेवारी दरम्यान होत आहे. या संमेलनाच्या उदघाटन प्रसंगी श्रीमती मोहपात्र बोलत होत्या. अध्यक्षस्थानी माध्यमिकच्या शिक्षणाधिकारी प्रिया देशमुख होत्या. प्रमुख उपस्थिती डायटचे प्राचार्य डॉ. मिलिंद कुबडे, प्राथमिकचे शिक्षणाधिकारी डॉ. अरविंद मोहरे, उपशिक्षणाधिकारी अनिल कोल्हे, बुद्धभूषण सोनोने, दीपक कोकतरे, शिक्षण विस्तार अधिकारी प्रविण खांडेकर, संगीता सोनोने, आश्विन मानकर, अजित पाटील, शाळा समितीच्या अध्यक्षा वृंदावना बोरकर, संदीप घाटे यांची होती. प्रारंभी, मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन व प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर रांगोळी, पाककला, मान्यवरांच्या हस्ते उदघाटन झाले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक तथा गटशिक्षणाधिकारी धनंजय वानखडे यांनी केले. संचालन सिबल शेख व अनुष्का मेश्राम यांनी केले. तर, आभार सृष्टी घाटे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी श्रीमजी परळकर, अतुल कडू, माधवी सावरकर, निलिमा राणे, प्राजक्ता गावंडे, विलास निचित, चारुशिला राऊत, बाळकृष्ण आंधळे, शेषराव मडावी, गजेंद्रसिंह धनांवत, विरेंद्रसिह ब्राम्हण, नितीन लोनाग्रे, गोपाल बोकडे, मंगेश मानकर, भावना चव्हाण यांच्यासह विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.–

# चांदूरबाजार तालुका फळगळ नुकसानग्रस्त यादीमध्ये घ्या !

## लोकविकास संघटनेचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन, आंदोलनाचा इशारा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३०चांदुर बाजार**

जिल्ह्यात जुलै ते ऑगस्ट दरम्यान झालेल्या ढगाळ वातावरण व सततच्या पावसामुळे संत्रा उत्पादक शेतकऱ्यांच्या संत्र्याची मोठ्या प्रमाणात फळगळ झालेती होती. प्रशासनाने जिल्ह्यातील संत्रा उत्पादक शेतकऱ्यांच्या मदतीसाठी शासनाला प्रस्ताव पाठवला होता. परंतु नुकसानग्रस्त संत्रा उत्पादकांच्या शासकीय मदत निधीतून चांदूरबाजार तालुक्याला वगळण्यात आले आहे. फळगळ नुकसानग्रस्त यादीमध्ये चांदूरबाजार तालुक्याचा समावेश करावा, या मागणीचे निवेदन लोकविकास संघटनेच्यवतीने जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले.

जिल्हाधिकारी सौरभ कटियार व कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष चांदूरबाजार तालुक्यातील शिरजगाव अर्डक शेतशिवारातील संत्रा उत्पादक शेतकऱ्यांच्या संत्रा फळगळची प्रत्यक्ष शेतात जाऊन पाहणी केली होती व नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने मदत देण्यासाठी आश्वस्त केले होते. परंतु काही दिवसांपूर्वी जाहीर झालेल्या मदतनिधीच्या यादीमधून चांदूरबाजार तालुका वगळण्यात आल्यामुळे संत्रा उत्पादक शेतकऱ्यांनी




आश्चर्य व्यक्त केले आहे.शासनाने जाहीर केलेल्या नुकसानग्रस्त यादीमध्ये अमरावती जिल्ह्यातील १४ तालुक्यांपैकी फक्त दहा तालुक्याचा समावेश करण्यात आला. दहा तालुक्यातील जवळपास ४२ हजार शेतकऱ्यांना १३४ कोटी रुपयाची मदत वितरित होणार आहे.मात्र त्यामधून चांदूरबाजार, अचलपूर, धारणी व दर्यापूर तालुक्याला वगळण्यात आले आहे. याबाबीची दखल घेऊन लोकविकास संघटनेचे संस्थापक अध्यक्ष गोपाल भालेराव यांनी जिल्हा अधिकाऱ्यांना निवेदन दिले. चांदूरबाजार तालुका संत्रा फळगडच्या नुकसानग्रस्त यादीमध्ये समावेश करून सर्व शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत करावी अन्यथा लोकविकास संघटना संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना घेऊन उग्र आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.

# डिजिटल पेमेंटमध्ये ११.११ टक्क्यांनी वाढ

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३० अमरावती–** देशात डिजिटल पेमेंटमध्ये वार्षिक आधारावर ११.११ टक्क्यांनी वाढ झाल्याची माहिती भारतीय रिझर्व्ह बँकेने जारी केलेल्या आकडेवारीतून ही माहिती समोर आली. सप्टेंबर २०२४ मध्ये डिजिटल पेमेंट निर्देशांक ४६५.३३ वर पोहोचला आहे.

मार्च २०२४ मध्ये तो ४४५.५ इतका होता. निर्देशांकात सहा महिन्यांत ११.११ टक्क्यांनी वाढ झाली आहे. देशात पायाभूत सुविधांचा विस्तार झाल्याने मार्च २०२८ पासून डिजिटल पेमेंट करणाऱ्या ग्राहकांच्या संख्येत सातत्याने वाढ होत आहे. गेल्या पाच वर्षांत डिजिटल पेमेंटचे प्रमाण सहा पटीने वाढले, तर वर्षभरात २०,७८७ कोटींचे व्यवहार डिजिटलने झाले.

डिजिटल पेमेंट वाढीची टक्केवारी काढण्यासाठी पाच मापदंडाचा आधार घेतला जातो. याशिवाय देशातील क्रेडीट कार्ड वापरकर्त्यांची संख्या



मागील पाच वर्षांत दुपटीने वाढली असून ती १०.८० कोटींवर पोहोचली आहे. तुलनेत डेबिट कार्डची संख्या कमी वाढली आहे.

डिसेंबर २०१९ मध्ये ८०.५३ कोटी असलेल्या डेबिट कार्डची संख्या डिसेंबर २०२४ पर्यंत ९९.०९ कोटींवर पोहोचली.

# मुख्यमंत्री सहाय्यता निधी अंतर्गत मदत मिळवणं होणार आणखी सोपं

## तज्ज्ञांची खास समिती स्थापन

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३०मुंबई**

मुख्यमंत्री सहाय्यता निधी अंतर्गत मदत मिळवणं होणार आणखी सोपं; तज्ज्ञांची खास समिती स्थापन

मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून दिल्या जाणाऱ्या वैद्यकीय मदतीत सुधारणा करण्यासाठी तज्ज्ञांची एक समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीचा उद्देश आजारांची यादी पुन्हा तपासणे, मदतीची रक्कम नव्याने ठरवणे आणि कोणती रुग्णालये या योजनेत सहभागी होतील, हे ठरवणे आहे. मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाचे प्रमुख रामेश्वर नाईक यांनी ही माहिती दिली.

समितीत कोण असणार?

या समितीमध्ये सरकारी अधिकारी आणि मोठ्या रुग्णालयांचे तज्ज्ञ डॉक्टर यांचा समावेश आहे. प्रमुख सदस्य खालीलप्रमाणे आहेत:

अध्यक्ष: संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई

सदस्य: आरोग्य संचालनालय, मुंबईचे संचालक

आयुष संचालनालय, मुंबईचे संचालक

सर ज.जी रुग्णालय, मुंबईचे अधिष्ठाता

लोकमान्य टिळक स्मारक रुग्णालय (सायन) चे अधिष्ठाता

मुख्यमंत्री यांचे सल्लागार डॉ. आनंद बंग

माजी संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई (डॉ. प्रवीण शिनगारे, डॉ. तात्याराव लहाने)



एशियन कॅन्सर इन्स्टिट्यूटचे संचालक डॉ. रमाकांत देशपांडे

केईएम हॉस्पिटल, मुंबईचे माजी अधिष्ठाता डॉ. अविनाश सुपे

टाटा मेमोरियल सेंटरचे संचालक डॉ. श्रीपाद बनावली

कौशल्य धर्मादाय रुग्णालय, ठाणेचे संचालक डॉ. संजय ओक

बॉम्बे हॉस्पिटल, मुंबईचे प्राध्यापक डॉ. बिच्छू श्रीरंग

हिंदुजा रुग्णालयाचे चीफ ऑपरेटिंग ऑफिसर डॉ. जॉय चक्रवर्ती

नायर हॉस्पिटल, मुंबईचे हृदयरोग तज्ज्ञ डॉ. अजय चौरसिया

बॉम्बे हॉस्पिटल, मुंबईचे कन्सल्टंट फिजिशियन डॉ. गौतम भन्साळी

### समिती काय काम करणार? आजारांची यादी तपासणार

सध्या २० आजारांना मदत मिळते, परंतु काही आजार इतर सरकारी योजनांमध्ये येतात. अशा आजारांचा पुनर्विचार केला जाईल. नवीन आजार योजनेत समाविष्ट करता येतील का, याबाबत शिफारस केली जाईल.याशिवाय सहाय्यता मिळण्यासाठी नवीन आजार समाविष्ट करण्याबाबत शिफारस करणं, रस्ते अपघात वगळून इतर अपघात प्रकरणांमध्ये कागदपत्रांची निश्चिती करणं, मुख्यमंत्री सहाय्यता निधीमधून मदत मिळण्याकरीता आजारांना देण्यात येणाऱ्या अर्थसहाय्यांच्या रकमांचे पुनर्विलोकन ( समीक्षण) करुन अनुज्ञेय रक्कम (मंजूर रक्कम) नव्याने निर्धारीत करण्याची शिफारस करणे, मुख्यमंत्री सहाय्यता निधीकरीता रुग्णालय संलग्नीकरणासाठी (एरिपिशश्रशव) रुग्णालयाच्या तपासणीचे महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना, केंद्र–राज्य सरकारच्या वैद्यकीय उपचाराबाबत असलेल्या इतर योजनांच्या धर्तीवर निकष ठरव्याबाबत शिफारस करणं यासाठी याकरिता ही समिती गठीत करण्यात आल्याचं मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाचे प्रमुख, रामेश्वर नाईक यांनी सांगितलंय.

नॅशनल कॅन्सर इन्स्टिट्यूट, नागपूरचे वैद्यकीय संचालक डॉ. आनंद पाठक

दीनानाथ मंगेशकर रुग्णालय, पुणेचे सचिव डॉ. माधव भट

मुख्यमंत्री सहायता निधी कक्षाचे कक्ष अधिकारी (सदस्य सचिव)

# परीक्षेच्या वेळेस बुरखा नको


## नितेश राणे यांचे शिक्षणमंत्र्यांना पत्र

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३०मुंबई**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक मंडळातर्फे घेण्यात येणाऱ्या दहावी आणि बारावीच्या परीक्षांसाठी अवघे काही दिवस शिल्लक राहिले आहेत. येत्या ११ फेब्रुवारीपासून बारावीची परीक्षा सुरु होणार आहे. तर येत्या २१ फेब्रुवारीपासून इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांची परीक्षा होणार आहे. या परीक्षांचं वेळापत्रक, हॉलतिकीट आणि परीक्षा केंद्र अशी सर्व तयारी करण्यात आली आहे. त्यातच आता मत्स्य विकास मंत्री नितेश राणे यांनी एक मोठी मागणी केली आहे. मुस्लिम परीक्षार्थी विद्यार्थिनींना बुरखा घालून परीक्षा केंद्रात प्रवेश देऊ नका. अशी मागणी नितेश राणे यांनी केली आहे. त्यांनी याबद्दलचे एक पत्र शिक्षणमंत्री दादा भुसेंना लिहिले आहे.

### लाड करण्याची गरज नाही

नितेश राणे म्हणाले, देशामध्ये राहताना इतर धर्मीय विद्यार्थ्यांना जो नियमम लागतो नियम मुस्लिम विद्यार्थ्यांना देखील पाळला पाहिजे. बुरखा घालून परीक्षेला बसाल तर त्याचे अनेक धोके आहे. संबधित खात्याने या संदर्भात लवकर लवकर निर्णय घ्यावा. राज्यात हिंदुत्ववादी विचाराचे सरकार आहे. आता लाड करण्याची गरज नाही.नितेश राणे पुढे म्हणाले, हा निर्णय २०२४ सालचा आहे. परीक्षेसोबतच मतदानाच्या वेळीही असे प्रकार उघडकीस आलेले आहेत. नेमकी तीच विद्यार्थी परीक्षेला आहेत का हे देखील पाहावं लागेल. इतर विद्यार्थ्यांप्रमाणे या मुलांनीही आपला धर्म शाळेत आणू नये.



इयत्ता १० वी आणि १२ वी परीक्षा ही विद्यार्थ्यांच्या दृष्टीने अत्यंत महत्वाच्या परीक्षा आहेत. यावर विद्यार्थ्यांचे संपूर्ण भविष्य अवलंबून आहे. सदर परीक्षा ही पारदर्शकपणे आणि कोणत्याही प्रकारचा अनुचित प्रकार जसे कॉपीमुक्त परीक्षा होणे अपेक्षित आहे. यासाठी शासन स्तरावरून वेळोवेळी सूचना जारी केल्या जातात. परीक्षांचं वेळापत्रक, हॉलतिकीट आणि परीक्षा केंद्र अशी सर्व तयारी करण्यात आली आहे. त्यातच आता मत्स्य विकास मंत्री नितेश राणे यांनी एक मोठी मागणी केली आहे. मुस्लिम परीक्षार्थी विद्यार्थिनींना बुरखा घालून परीक्षा केंद्रात प्रवेश देऊ नका. जर परीक्षार्थींना बुरखा घालून परीक्षा केंद्रावर प्रवेश देण्यात आला तर एखादा परीक्षार्थी बुरखा घालून इलेक्ट्रॉनिक उपकरणाचा उपयोग करून परीक्षा देत आहे किंवा नाही, हे तपासणे शक्य होत नाही. आकस्मिक प्रसंगी काही आक्षेप उद्भवल्यास सामाजिक तसेच कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊन अनेक विद्यार्थ्यांना नुकसान सहन करावे लागेल.

# नाशिक जिल्ह्यात विहिरी खोदण्यास बंदी!

## येवला, निफाड, सिन्नर आणि इगतपुरी, कलवल, नाशिक या तालुक्यांमध्ये भूजल पातळीत मोठी घट

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३०नाशिक**

नाशिकच्या भूजल सर्वेक्षण विभागाच्या अहवालातून अनेक चिंताजनक माहिती समोर येत आहे. या अहवालानंतर नाशिक जिल्ह्यातील ७७६ गावांमध्ये विहिरी खोदण्यास बंदी घालण्यात आली आहे. प्रत्यक्षात, पिण्यासाठी आणि सिंचनासाठी जास्त प्रमाणात पाणी उपसा केल्यामुळे पाण्याची पातळी कमी झाली आहे. ज्या गावांनी १०० टक्क्यांहून अधिक पाणी शोषले आहे त्यांना पुढील विहिरी खोदण्यास बंदी घालण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. नाशिक जिल्ह्यातील अनेक तालुक्यांमध्ये पाण्याची पातळी कमी झाली आहे. नाशिक जिल्ह्यात सर्वाधिक कृषी क्षेत्र आहे आणि येथे प्रामुख्याने कांदा, ऊस, गहू आणि द्राक्षे तसेच फळबागा लागवड केली जाते.


येवला, निफाड, सिन्नर आणि इगतपुरी, कलवल, नाशिक या तालुक्यांमध्ये भूजल पातळीत मोठी घट झाल्याची माहिती सर्वेक्षण विभागाने दिली आहे, जिथे बहुतेक शेती केली जाते.शेतीपिकावर अभाव दिसून येईल . या पाण्याच्या संकटामुळे जगाचा पोशिंदा हैराण झाला आहे. पाणी न मिळाल्यामुळे नागरिक त्रस्त झाले हे हे खरे. नाशिक तालुक्यातील गिरवणे–आळंदी धरणालगतच्या गावांमध्येही भूजल पातळीत मोठी घट दिसून आली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना आता शेतातील पिके वाचवण्यासाठी कठोर परिश्रम करावे लागतील. काही ठिकाणी द्राक्षे, कांदे आणि गहू यासारख्या पिकांसाठी पुरेसे पाणी नाही आणि परिस्थिती अशी बनली आहे की भविष्यात शेतकऱ्यांना या पिकांना वाचवण्यासाठी टँकरची व्यवस्था करावी लागू शकते. जानेवारी महिन्यातच पाण्याच्या कमतरतेमुळे शेतकऱ्यांना त्यांच्या पिकांसाठी पुरेसे पाणी मिळण्याची शक्यता नाही. कृषी उत्पादनातही मोठी घट झाली आहे.

नाशिक तालुक्यातील मातुरी–मुंगसरा शिवारात



अतिशय गंभीर परिस्थिती दिसून आली. भूजल सर्वेक्षण अहवाल आल्यानंतर शेतकऱ्यांना वेगळी विहीर खोदण्याची परवानगी न देण्याचे निर्देश असल्याने शेतकऱ्यांना सरकारी अनुदानही मिळणार नाही. यामुळे या शेतकऱ्यांना दुहेरी संकटाचा सामना करावा लागत आहे. पाण्याची पातळी घसरण्याचे मुख्य कारण म्हणजे पाण्याचे जास्त प्रमाणात शोषण आणि पावसाचे पाणी साठवण्यात अपयश. अशा परिस्थितीत, पाणी रोखण्याच्या सरकारच्या योजना प्रभावीपणे राबवल्या पाहिजेत अशी अपेक्षा आहे.

# बुलढाण्यात टक्कल व्हायरसनंतर आता दृष्टीदोषाचा धोका?



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०बुलढाणा**

बुलढाणा जिल्ह्यातील शेगावच्या अनेक गावांत गेल्या काही दिवसांपूर्वी टक्कल व्हायरसने धुमाकूळ घातल्याच्या बातम्या समोर आल्या होत्या. आधी डोक्याला खाज सुटणं, नंतर केस गळून सरळ हातात येणं आणि त्यानंतर तिसऱ्या दिवशी चक्क टक्कल पडणं, यामुळेच नागरिकांमध्ये भितीचं वातावरण पसरले होते. या घटनेची चर्चा देशभर सुरु झाल्याचे पाहायला मिळाले होते. तरुणांपासून ते वृद्धापर्यंत सर्वांचे केस गळू लागल्याने या गावातील लोकांची समस्या राष्ट्रीय समस्या ठरली होती. या लोकांना फंगल इन्फेक्शन झाले नसल्याचा दावा डॉक्टरांनी केला होता. तर यासमस्येदरम्यान आयसीएमआरच्या पथकाने गावात येऊन तपासणीही केली होती. मात्र ठोस काही कारण समोर आलं नाही. दरम्यान, यासंदर्भात आता नवी अपडेट समोर आली आहे. शेगाव तालुक्यातील बोंडगावा तील अनेक लोकांच्या डोक्यावर आता एका औषधाने केस उगवले आहेत. परंतू आता त्यांना नवीन समस्या सुरु झाली आहे. ज्या लोकांना टक्कल पडले होते. जे केस गळतीच्या समस्येने हैराण झाले होते. त्यांना आता डोळ्यांचा त्रास सुरू झाला आहे. तर काहींची नजर कमजोर होत असल्याचे या गावातील लोकांकडून सांगितले जात आहे. तर केस गळतीनंतर आता या समस्येवर तात्काळ निदान शोधण्यासाठी गावकऱ्यांकडून मागणी केली जात आहे.

# उद्याला मूकनायक पत्रकार सन्मान सोहळा

## ज्येष्ठ पत्रकार संपादक ज्ञानेश महाराव यांना राज्यस्तरीय मूकनायक पुरस्कार घोषित
## दिलीप एडतकर, राहुल गडपाले यांची राहणार विशेष उपस्थिती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अमरावती**












अमरावतीमूकनायक पत्रकार सोहळा आयोजन समितीच्या वतीने दरवर्षी मूकनायक पत्रकार सन्मान सोहळा आयोजित करण्यात येत असून यावर्षी हा सन्मान सोहळा शुक्रवारी ३१ जानेवारी २०२५ ला सायंकाळी ६ वाजता स्थानिक मातोश्री विमलाबाई देशमुख सभागृहात आयोजित करण्यात आला आहे.या सोहळ्याला ज्येष्ठ विचारवंत, साहित्यिक ज्ञानेश महाराव उपस्थित राहणार असून त्यांच्या व्याख्यानाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला असल्याची माहिती मूकनायक पुरस्कार सोहळा समितीचे प्रा. संजय शेंडे यांनी जिल्हा मराठी पत्रकार भवन येथे गुरुवार (ता.३०) रोजी पत्र परिषदेत दिली.

मूकनायक राज्यस्तरीय पुरस्कार ज्येष्ठ पत्रकार संपादक,नाटककार ज्ञानेश महाराज यांना तर मूकनायक जीवनगौरव पुरस्कार दूरदर्शनचे प्रतिनिधी ज्येष्ठ पत्रकार यशपाल वरठे, सामाजिक दायित्व पुरस्कार लोकमत मेळघाटचे प्रतिनिधी नरेंद्र जावरे, छत्रपती शाहू महाराज पुरस्कार द हितवाद जिल्हा प्रतिनिधी प्रवीण कपिले, सामाजिक न्याय पुरस्कार दैनिक विदर्भ मतदारचे क्राईम रिपोर्टर रवींद्र खंडारे यांना निवड समितीने घोषित केला असल्याची माहिती प्रा संजय शेंडे यांनी दिली.

कार्यक्रमाला अध्यक्ष दैनिक विदर्भ मतदारचे संपादक ॲड. दिलीप एडतकर राहणार असून, मुख्य अतिथी म्हणून सकाळ वृत्तपत्राचे समूह संपादक राहुल गडपाले उपस्थित राहणार आहेत. तर प्रमुख अतिथी म्हणून खासदार बळवंत वानखडे, आमदार सुलभाताई खोडके, आमदार रवी राणा उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाला शहरातील नागरिकांनी मोठ्याप्रमाणात उपस्थित राहावे, असे आवाहन मूकनायक पत्रकार सोहळा आयोजन समितीचे संजय शेंडे यांनी केले. पत्र परिषदेला मूकनायक पत्रकार सोहळा समितीचे प्रा मनीष भंकाळे, दिनेश जामणीक,छगन जाधव, नयन मोंढे उपस्थित होते.

# मुख्यमंत्री यांचा प्रतिकात्मक पुतळा जाळल्या प्रकरणातून निर्दोष सुटका

## शेतकऱ्यांसाठी संघर्ष सुरूच राहणार



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अमरावती**

मार्च २०१७ मध्ये मंत्रालयात नुकसान भरपाई मागण्यासाठी गेलेल्या शेतकऱ्याला मुख्यमंत्र्यांच्या सुरक्षा रक्षकांनी मारहाण केली.या घटनेचा निषेध करण्यासाठी आम्ही शेतकरी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी मुख्यमंत्र्यांचा प्रतिकात्मक पुतळा जाळल्या प्रकरणी २०१७ मध्ये संघटनेच्या पदाधिकार्यावर गाडगेनगर पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल झाले होते,औरंगाबाद जिल्ह्यातील शेतकरी रामेश्वर भुजाडे यांचे गारपिटीमुळे शेतमालाचे नुकसान झाले होते,या नुकसान भरपाईच्या मागणीसाठी ते मुख्यमंत्र्यांना भेटण्यासाठी मंत्रालयात गेले असतांना तेथील सुरक्षा रक्षकांनी त्या शेतकऱ्याला बेदम मारहाण केली होती,त्या घटनेचा आम्ही मुख्यमंत्र्याचा पुतळा जाळून निषेध व्यक्त केला होता, त्याचे पडसाद राज्यभर उमटले होते, एकीकडे शेतकरी जगाचा पोशिंदा म्हणायचे व दुसरीकडे त्याला या राज्यकर्त्यांनी आपल्या पायदळी तुडवायचे हे शेतकरी संघटना कदापिही सहन करणार नाही, शेतकऱ्यांच्या भरवशावर केंद्र सरकार व राज्यसरकार निवडून आले, पण त्यांनाच वाऱ्यावर सोडले आहे,सोयाबीन व कापसाचे भाव मातीमोल करून टाकले आहे, आयात निर्यात धोरण चुकीच्या पध्दतीने केले जाते,आमच्यावर कितीही गुन्हे दाखल झाले तरीही आम्ही आमचा लढा शेतकऱ्यांसाठी सुरूच ठेऊ.निर्दोष झालेल्या मध्ये अमित अढाऊ,प्रविण मोहोड, आनंद आमले, चंद्रकांत देशमुख सह इतर पदाधिकारी होते.

# प्रहार युवा आघाडीचे जिल्हा प्रमुख शाम कथे पाटील यांचा शेकडो कार्यकर्त्यांसोबत युवा स्वाभिमान पार्टीमध्ये जंगी प्रवेश

## आ.रवि राणा यांनी दुपट्टे टाकून शाम कथे पाटील व कार्यकर्त्यांचे केले मनस्वी स्वागत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३० अमरावती**



उठ तरुणा जागा हो, युवा स्वाभिमानचा धागा हो हे ब्रीदवाक्य घेवून युवा स्वाभिमान पार्टीची स्थापणा करणारे युवा स्वाभिमान पार्टीचे संस्थापक अध्यक्ष तथा आ.रवि राणा यांनी युवा स्वामिभान पार्टीमध्ये येणाऱ्या व कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांना खऱ्या अर्थाने जोपासले असून प्रत्येक कार्यकर्ता हा रवि राणा यांच्या खांद्याशी खांदा लावून युवा स्वाभिमान पार्टीच्या वतीने तळागळातील जनतेची सेवा करत असतात. आ.रवि राणा व युवा स्वाभिमान पार्टीचे हे कार्य बघून विविध पक्षातील व संघटनेतील कार्यकर्ते व पदाधिकारी युवा स्वाभिमान पार्टीमध्ये प्रवेश घेण्याचे सत्र जोमात सुरु आहे त्या अनुषंगाने प्रहार मध्ये अनेक वर्ष युवा आघाडी जिल्हा प्रमुख म्हणून कार्य करणारे शाम कथे यांनी व आपल्या शेकडो कार्यकर्त्यांसह युवा स्वाभिमान पार्टीमध्ये जंगी प्रवेश घेतला यावेळी आ.रवि राणा यांनी सुद्धा शाम कथेसह शेकडो कार्यकर्त्यांच्या गळ्यात युवा स्वाभिमान पार्टीचे दुपट्टे टाकून व पुष्पगुच्छ देऊन मनस्वी स्वागत केले यावेळी शाम कथे व इतर शेकडो कार्यकर्त्यांनी आपले मनोगत व्यक्त करतांना सांगितले की आ.रवि राणा यांच्यासारख्या तळागळातील जनतेची सेवा करत आपला जास्तीत जास्त वेळ जनतेच्या विकास कामाकरिता देणाऱ्या सामान्य जनतेची जाण ठेवणाऱ्या नेत्यासोबत काम करणे हे आम्हा सर्वांचे सौभाग्य असल्याचे स्पष्ट केले तसेच आम्हीसुद्धा आ.रवि राणा यांच्या खांद्याशी खांदा लावून जनतेची सेवा करु हेही यावेळी स्पष्ट केले. याप्रसंगी विनोद जायलवाल, मंगेश ठाकरे, सुमित ठाकूर, श्रीकांत इंगळे, रवि अडोकार,करण डेडवाल, राजेश बनारसे, चंदन जाधव, मंगेश खाकरे, सुमित ठाकुर, आदर्श कपाटे, अविनाश काळे, नितीन मस्के, अवि काळे, व असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

# वरुड येथे लवकरच उभारणार अत्याधुनिक बस स्थानक

## आमदार उमेश यावलकर यांनी केली बसस्थानकाची पाहणी : वरुड बस स्थानकात आधुनिक सोयी-सुविधा; प्रवाशांना मिळणार दिलासा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०वरुड**



वरुड येथील स्थानिक बस स्थानकावर अनेक वर्षांपासून असलेल्या विविध समस्यांमुळे प्रवाशांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. याच पार्श्वभूमीवर आमदार उमेश यावलकर यांनी वरुड बस स्थानकाची पाहणी करून प्रत्यक्ष परिस्थितीची माहिती घेतली. पाहणीदरम्यान, बस स्थानकावर मुलभूत सोयी-सुविधांचा अभाव असल्याचे लक्षात आले. त्यामुळे प्रवाशांच्या सुविधांसाठी तातडीने उपाययोजना करण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत.

वरुड येथील बस स्थानक अधिक सुसज्ज आणि प्रवाशांसाठी सोयीस्कर होण्यासाठी आमदार उमेश यावलकर यांनी महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुचेकर यांच्याकडे बस स्थानक विकास आराखड्यास मंजुरी देण्याची मागणी केली आहे. त्यामुळे लवकरच वरुड येथे अत्याधुनिक सोयी-सुविधांनी युक्त नवीन बस स्थानक उभारले जाणार आहे. यासाठी संपूर्ण नियोजन करून लवकरात लवकर मान्यता देण्याचे आदेश संबंधित विभागाला देण्यात आले आहेत.

वरुड-मोर्शी प्रवाशांसाठी अधिक बसेसची मागणी : वरुड आणि मोर्शी या मार्गावर प्रवाशांची मोठी वर्दळ असते. सध्या या मार्गावर बससेवा मर्यादित असून प्रवाशांना अनेक वेळा प्रवासासाठी प्रतीक्षा करावी लागते. त्यामुळे प्रवाशांची गैरसोय होऊ नये म्हणून या मार्गावर अतिरिक्त बसेसची संख्या वाढवावी, अशी मागणी स्थानिक नागरिकांनी केली आहे. या मागणीसंदर्भातही आमदार उमेश यावलकर यांनी परिवहन महामंडळाकडे निवेदन सादर केले असून, लवकरच या मागणीवर सकारात्मक निर्णय होण्याची अपेक्षा आहे.

बस स्थानकाच्या उभारणीसाठी तसेच बस सेवांच्या सुधारणा करण्यासाठी प्रशासन सक्रिय असून, लवकरच प्रवाशांना नव्या सुविधा उपलब्ध होणार आहेत. स्थानकाच्या विकास आराखड्यात स्वच्छता सुविधा, विश्रांतीगृह, तिकीट बुकिंग केंद्र, डिजिटल मार्गदर्शन फलक तसेच प्रवाशांसाठी आवश्यक सोयी सुविधा समाविष्ट केल्या जाणार आहेत. त्यामुळे वरुड शहरातील आणि मोर्शी मतदार संघातील प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे.

# उत्तरप्रदेश-बंगालच्या महिलांनी घेतला महाराष्ट्रातील लाडक्या बहीण योजनेचा लाभ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अमरावती**



मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेमध्ये चक्क परराज्यातील बोगस लाभार्थींचे रॅकेट समोर आले आहे. लातूर आणि सांगली जिल्ह्यातील अंगणवाडी सेविका असल्याचे दाखवून बोगस लॉगिन आयडी तयार केले आणि त्याद्वारे चक्क ११७१ अर्ज दाखल केले. अर्ज दाखल केलेल्यांमध्ये राज्यातील विविध जिल्ह्यांमधील रहिवासी दाखवले आहेत.

प्रत्यक्षात हे भामटे उत्तर प्रदेश, आसाम, पश्चिम बंगाल आणि राजस्थानमधील असल्याचे पोलिस, महसूल आणि महिला व बालविकास विभागाच्या तपासात पुढे आले आहे. याबाबत सोलापूर जिल्ह्यातील बार्शी शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. ज्या दोन लॉगइनवरून ११७१ अर्ज दाखल झालेले आहेत, त्यापैकी २२ अर्ज हे एकट्या बार्शी तालुक्यातील आहेत. या अर्जदारांचा लाभ थांबवण्यात आलेला आहे.अर्जांची छाननी करताना सोलापूर जिल्ह्यातील बार्शी तालुक्यातील एका गावामध्ये मुस्मिम महिलांची नावे लाडकी बहीण योजनेत आढळली. प्रत्यक्षात त्या गावात एकही मुस्लिम नसल्याचे महिला व बालविकास विभागाच्या एका कर्मचाऱ्याच्या लक्षात आले. त्यांनी आधार क्रमांकाशी लिंक असलेले बँक खाते तपासले, ते खाते सेंट्रल बँकेचे होते. त्यानुसार सेंट्रल बँकेतून संबंधित खातेदाराचा पत्ता आणि मोबाईल काढला असता ते चक्क उत्तर प्रदेश, आसाम, पश्चिम बंगाल, राजस्थान येथील असल्याचे आढळले.

# आमदार उमेश यावलकर यांनी घेतला पांदन रस्त्यांचा आढावा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. ३० वरूड**

मोर्शी विधानसभा मतदारसंघाचे आमदार उमेश उर्फ चंदु यावलकर यांनी वरूड तालुक्यातील प्रलंबित पांदन रस्त्यांची कामे लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांसोबत आढावा बैठक घेण्यात आली. या बैठकीत त्यांनी रखडलेली पांधण रस्त्याची कामे तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश दिले. दरम्यान बैठकीला संबंधित विभागाचे प्रमुख अधिकारी, तालुक्यातील शेतकरी आणि भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते. वरूड तहसील कार्यालयात झालेल्या या आढावा बैठकीला अमरावती जिल्ह्याचे रोजगार हमी योजना विभागाचे उपजिल्हाधिकारी, तहसीलदार, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंते तसेच समस्याग्रस्त शेतकरी उपस्थित होते. तालुक्यातील शेतकरी आणि ग्रामपंचायत प्रतिनिधींनी देखील या बैठकीत पांदन रस्त्यांसंबंधीच्या समस्या मांडल्या.

तालुक्यातील अनेक गावांमध्ये पांदन रस्त्यांची दुरवस्था झाली असून काही ठिकाणी मंजुरी मिळूनही कामे रखडली आहेत.

# अमरावती महानगरपालिकेतर्फे महात्मा गांधी यांना विनम्र अभिवादन : शहिदांना श्रध्दांजली अर्पण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अमरावती**





गुरुवार दिनांक ३० जानेवारी,२०२५ रोजी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची पुण्यतिथी निमीत्य मा.आयुक्त सचिन कलंत्रे यांच्या हस्ते महात्मा गांधीच्या प्रतिमेस हारार्पण करण्यात आले. त्यानंतर महानगरपालिकेच्या प्रांगणात अधिकारी, कर्मचारी व नागरीक यांनी शहिदांना दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

नागरीकांना मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करण्याकरीता सुचना म्हणून महानगरपालिकेने सकाळी १०.५९ ते ११.०० वाजेपर्यंत मौन पाळण्याबाबत सायरन वाजविण्यात आला तसेच मौन सोडण्याकरीता पुन्हा ११.०२ ते ११.०३ ला सायरन वाजविण्यात आला. या कार्यक्रमानंतर जयस्तंभ चौक येथील महात्मा गांधीच्या पुतळ्यास हार्रापण करण्यात आले.

यावेळी अतिरिक्त आयुक्त महेश देशमुख, उपायुक्त योगेश पिठे, उपायुक्त डॉ.मेघना वासनकर, उपायुक्त नरेंद्र वानखडे, शहर अभियंता ईश्वरनंदा पनपालिया, मुख्यलेखापरिक्षक श्यामसुंदर देव, मुख्यलेखापाल दत्तात्रय फिस्के, सहाय्यक आयुक्त भुषण पुसतकर, सिस्टीम मॅनेजर अमित डेंगरे, कार्यकारी अभियंता रविंद्र पवार, उद्यान अधिक्षक श्रीकांत गिरी, कार्यालय अधिक्षक नंदकिशोर पवार, उपअभियंता विवेक देशमुख, वैद्यकीय अधिकारी डॉ.संदिप पाटबागे, वैद्यकीय अधिकारी डॉ.प्रतिभा आत्राम, महानगरपालिका संघटनेचे सरचिटणीस प्रल्हाद कोतवाल, अधिकारी, कर्मचारी, नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.